**मेसर्स शिवनेरी शुगर्स लिमिटेड, मुक्काम पोस्ट - गणेश टेकडी, न्हावी बुद्रुक, तालुका-कोरेगाव, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या जिजामाता शुगर एन्ड पॉवर इंडस्ट्रीज लिमिटेडच्या अधिग्रहण पश्चात साखर कारखाना आधुनिकीकरणासाठी गाळप क्षमता प्रस्तावित विस्तारिकरण (८००.० टी.सी.डी. स्क्रॅप करून नविन १०,००० टी.सी.डी प्रकल्प उभारणी), नविन सहविद्युत निर्मिती - ६०.० मेगावॅट व मळी आधारित आसवणी - २००.० किलोलीटर / दिन उत्पादन क्षमता प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतान्त**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शिवनेरी शुगर्स लिमिटेड, मुक्काम पोस्ट - गणेश टेकडी, न्हावी बुद्रुक, तालुका-कोरेगाव, जिल्हा - सातारा यांच्या जिजामाता शुगर एन्ड पॉवर इंडस्ट्रीज लिमिटेडच्या अधिग्रहण पश्चात साखर कारखाना आधुनिकीकरणासाठी गाळप क्षमता प्रस्तावित विस्तारीकरण (८००.० टी.सी.डी. स्क्रॅप करून नविन १०,००० टी.सी.डी प्रकल्प उभारणी), नविन सहविद्युत निर्मिती - ६०.० मेगावॅट व मळी आधारित आसवणी - २००.० किलोलीटर / दिन उत्पादनक्षमता प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०३ मे, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - २७/२०१९, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- १५३४, दि. ०३/०५/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) श्री सुनील थोरवे, - **अध्यक्ष**
अप्पर जिल्हादंडाधिकारी, सातारा
(मा. जिल्हादंडाधिकारी, सातारा यांचे प्रतिनिधी)

२) श्री.दि.को.खेडकर, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे
(मप्रनि मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) श्री बाबासाहेब कुकडे, - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सातारा

पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी दिवशी सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी,पुणे हे महत्वाच्या कार्यालयीन कामामुळे सुनावणीवेळी हजर राहु शकले नाहीत.सदर पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी ही मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी,सातारा व समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी,सातारा यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आली.

श्री. बाबासाहेब कुकडे, सदस्य समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री कुकडे यांनी असे सांगितले की, उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शिवनेरी शुगर्स लिमिटेड, मुक्काम पोस्ट - गणेश टेकडी, न्हावी बुद्रुक, तालुका- कोरेगाव, जिल्हा - सातारा यांच्या जिजामाता शुगर एन्ड पॉवर इंडस्ट्रीज लिमिटेडच्या अधिग्रहण पश्चात साखर कारखाना आधुनिकीकरणासाठी गाळप क्षमता प्रस्तावित विस्तारीकरण (८००.० टी.सी.डी. स्क्रॅप करून नविन १०,००० टी.सी.डी प्रकल्प उभारणी), नविन सहविद्युत निर्मिती - ६०.० मेगावॅट व मळी आधारित आसवणी - २००.० किलोलीटर / दिन उत्पादनक्षमता संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये **संवर्ग अ मध्ये** [साखर उत्पादनासाठी - ब ५ (जे), मळी आधारित आसवणी प्रकल्पासाठी - अ ५ (जी) व सहविद्युत प्रकल्पासाठी - अ १ (ड)] मोडत असल्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली (टीओआर) व सदरहू विभागाच्या समितीने -------- बैठकीत दरम्यान दिनांक १२/१०/२०१८ रोजी त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रज़ीत दिनांक ०३ एप्रिल, २०१९ रोजी पर्यावरणविषयक जाहिर सुनावणीची सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत भारत सरकारच्या पर्यावरण, वने, हवामान बदल कार्यालय, पश्चिम विभाग, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय- सातारा, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सातारा, जिल्हा परिषद - सातारा, जिल्हा उद्योग केंद्र - सातारा, तालुका कार्यालय-कोरेगाव, जिल्हा - सातारा, ग्रामपंचायत कार्यालये - न्हावी बुद्रुक, पिंपरी, साप आणि वेळू, तालुका - कोरेगाव, जिल्हा - सातारा, मुख्यालय - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, वेबसाईट - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. सदस्य, समन्वयक यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांना काही लेखी आक्षेप प्राप्त झालेले असून सबंधितांना बैठकीस हजर राहण्याचा सूचना करण्यात आलेल्या आहेत. सदस्य, समन्ववयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री कुकडे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री सुनील थोरवे, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका§यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाची स्थापना व नविन प्रकल्प प्रवर्तकांनी कार्यरत प्रकल्पाचे केलेले अधिग्रहण, प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेला पर्यावरण व्यवस्थापन योजना, पर्यावरणविषयक तपासणी कार्यक्रम, क्रेप मानके व भारत सरकारच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी

भविष्यातील पर्यावरण योजनांसाठी राखीव ठेवलेला सामुदायिक सामाजिक जबाबदारी निधी (Corporate Social Responsibility Fund) व प्रकल्पातील रोजगाराच्या संधी याबाबत संपूर्ण माहिती दिली.

त्यानंतर श्री सुनील थोरवे, अध्यक्ष यांनी सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

१) **<u>श्री हिंदुराव तातोबा देसाई, राहणार-३८५/४, शनिवार पेठ,कराड, जिल्हा-सातारा</u>**ः-श्री देसाई यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की, सदरहू जाहिर लोकसुनावणी ही मे. शिवनेरी शुगर्स लिमिटेड, मुक्काम पोस्ट-न्हावी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा यांच्या प्रस्तावित साखर उत्पादन ८००.० टीसीडी पासून १०,०००.० टीसीडी पर्यंत, नविन प्रस्तावित ६०.० मे.वॅट सहविद्युत प्रकल्प व नविन प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्प २००.० किलो लिटर/दिन प्रकल्पासाठी आहे. मात्र मे. शिवनेरी शुगर हा प्रकल्प अस्तित्वातच नाही. त्यामुळे सदरहू कारखान्याचे विस्तारिकरण कसे होऊ शकते? आता बैठकीत असे सांगण्यात आले की सदरहू स्थानावर प्रकल्प उभारणे व कार्यरत करण्यासाठी मे. जिजामाता शुगर ॲन्ड पॉवर इंडस्ट्रीजस शासनाच्या सक्षम प्राधिकरणाने प्रदान केलेले. आयईएम. मे. शिवनेरी शुगर यांनी विकत घेतले आहेत. मात्र जिजामाता शुगर अन्ड पॉवर इंडस्ट्रीज हा कारखानाही अस्तित्वात नाही. कारण सदरहू जिजामाता शुगर प्रकल्पाने २००३-२००४ गळीत हंगामापासून आजपावेतो उसाचे गाळप करुन साखरेचे व्यापारी उत्पादन केलेले नाही किंवा इथेनॉल उत्पादन केलेले नाही. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की भारत सरकारच्या अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ नुसार ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ च्या कलम ६अ मधील स्पष्टीकरण १ प्रमाणे पाच वर्ष कार्यरत नसणाऱ्या साखर कारखान्याचे आय.ई.एमहे आपोआप रद्दबादल होते. मग नविन प्रकल्प प्रवर्तकांनी (शिवनेरी शुगर्स) जुन्या प्रकल्प प्रवर्तकांकडून (जिजामाता शुगर एन्ड पॉवर इंडस्ट्रीज) आयईएम. कसे विकत घेऊ शकते? तरी नविन प्रकल्प प्रवर्तकांना त्यांच्या अस्तित्वात नसलेल्या कारखाना विस्तारीकरणाच्या नावाखाली बेकायदेशिर उभारणी करणाऱ्या प्रकल्पास मप्रनि मंडळाने परवाना प्रदान करु नये व पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचे कामकाज त्वरित स्थगित करण्यात यावे.

➢ प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की नविन प्रकल्प प्रवर्तकांनी (शिवनेरी शुगर्स) सर्व कायदेशीर, तांत्रिक बाबींची पूर्तता केलेली असून भारत सरकारच्या व महाराष्ट्र शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकरणांनी नविन प्रकल्पासाठी विविध परवाने प्रदान केलेले आहेत. त्याचा सर्व बाबींचे संपूर्ण अवलोकन करुनच भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने टर्म्स ऑफ रेफरन्स

(टी.ओ.आर.) मंजूर करुन पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्याची व पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यांनी पुढे असे सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे परिसरात सामाजिक व आर्थिक विकास होईल व स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. श्री देसाई यांनी असे मत मांडले की याबाबत भारत सरकारच्या अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय व ग्राहक संरक्षण मंत्रालयाचे अभिप्राय घेण्यात यावे.

२) <u>श्री जे. बी. पिसाळ, मुख्य लेखा अधिकारी, सह्याद्री साखर कारखाना लिमिटेड, यशवंतनगर, तालुका-कराड, जिल्हा-सातारा</u>:- श्री पिसाळ यांनी आक्षेप नोंदविताना असे सांगितले सथानिक मप्रनि मंडळ कार्यालयाने दिनांक ३ एप्रिल, २०१९ रोजी दैनिक पुढारी सातारा आवृत्तीत प्रसिध्द केलेल्या जाहिर सूचनेनुसार शिवनेरी शुगर लिमिटेड, मुक्काम पोस्ट-न्हावी बुद्रुक, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा याच्या प्रस्तावित ऊस उत्पादन ८०० टीसीडी क्षमतेपासून १०,००० टीसाडी क्षमतेपर्यंत, बगॅसवर आधारित नविन सहवीज निर्मीत-६०.० मे.वॅट व मळीवर आधारित आसवणी प्रकल्प (२००.० किलोलिटर/दिन) प्रकल्पाबाबत सामान्य जनतेस हरकती मांडण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. जर शिवनेरी शुगर लिमिडेट हा प्रकल्प हा अस्तित्वात नाही, तर विस्तारिकरण कसे करण्यात येणार? त्यांनी सांगितले की पुर्वीचे प्रकल्प प्रवर्तक यांनी १७/०३/२००८ रोजी प्राप्त आय.ई.एममध्ये बदलाची परवानगी घेतली व जिजामाता शुगर एन्ड पॉवर इंडस्ट्रिज लिमिटेड असे नाव घेतले. त्यांनी २००३-२००४ ऊस गळीत हंगामापासून २०१८-२०१९ ऊस गळीत हंगामापर्यंत ऊसाचे गाळप करुन साखरेची व्यापारी निर्मिती केलेली नाही. त्यांनी असाही आक्षेप नोंदविला की जर पाच वर्षे ऊस गाळप व साखरेचे व्यापारी उत्पादन केले नाही, तर प्रदान करण्यात आलेली आय.ई.एम रद्दबादल होते. त्यांनी याबाबत भारत सरकारच्या अत्यावश्यक वस्तु कायदा, १९५५ मधील ऊस नियंत्रण आदेश १९६६ चे कलम ६अ/१ अन्वये दोन्हीही कारखाने (जिजामाता शुगर अण्ड पॉवर इंडस्ट्रिज लिमिटेड व शिवनेरी शुगर लिमिटेड) हे अस्तित्वात असलेले कारखाने नाहित असे प्रतिपादन केले.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की दोन्ही कंपनीने मूळ आय.ई.एम नं.२६५४, दिनांक १८/०९/२००३ परवान्यानुसार सन २००३-२००४ हंगामापासून ऊस गळीत हंगामात ऊस गाळप करुन साखर उत्पादन व इथेनॉल उत्पादन केले नाही. त्यामुळे त्यांनी ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ६क चे उल्लंघन केलेले आहे. सदरहू दोन्ही कारखान्यांना मान्यताप्राप्त आय.ई.एम नसल्याने त्यांचे कायदेशीर अस्तित्व

राहिलेले नाही. त्यांनी या सदंर्भात भारत सरकारच्या ग्राहक संरक्षण मंत्रालय, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय यांना दिनांक ११/०४/२०१९ रोजी लेखी तक्रार अर्ज पाठविला असल्याची माहिती दिली.

तसेच त्यांनी आक्षेप नोंदविताना सूचना केली की सदरहू विस्तारवाढीच्या नावाखाली बेकायदेशीर ऊभारणी होणाऱ्या साखर कारखान्यासाठी मप्रनि मंडळाने परवाना प्रदान करु नये व पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी या आक्षेपकांना उत्तर देताना सांगितले की, या मुद्द्यांवर चर्चा झालेली असून सर्व कायदेशीर व तांत्रिक पुर्तता करण्यात आलेली आहे. त्यांनी सदरहू सुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक काही आक्षेप, सूचना करण्याचे आवाहन केले.

३) **<u>श्री शंकर कणसे, राहणार-पिंपरी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-साताराः-</u>** श्री कणसे यांनी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांनी उत्पादनाच्या वेळी लागणाऱ्या कच्चा मालासाठी स्थानिक शेतकऱ्यांचाच विचार करावा. सदरहू प्रकल्पामुळे रोजगाराची संधि मिळेल. त्यामुळे कारखान्याची आवश्यकता आहे. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण संवर्धन करणेही गरजेचे आहे.

४) **<u>श्री युवराज नारायण घाडगे, राहणार-पिंपरी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-साताराः-</u>** परिसरातील युवकांना रोजगाराची गरज असल्याने कारखाना कार्यान्वित होणे अत्यंत आवश्यक आहे.

५) **<u>श्री शिवराज निकम, राहणार-न्हावी बुद्रुक, तालुका-कोरेगाव, जिल्हा-साताराः-</u>** श्री निकम यांनी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरणविषयक संरक्षण संवर्धन योजना वेळोवेळी कार्यान्वित करण्याची लेखी हमी द्यावी. प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू बैठकीच्या इतिवृतान्तात सर्व बाबींची नोंद घेण्यात येते व सदरहू इतिवृत्त व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या तज्ञ समितीस सादर करण्यात येतो. त्यावर तज्ञ समिती सर्व बाबींचा अभ्यास करुनच पर्यावरण अनुमती प्रदान करते. पर्यावरण अनुमतीची प्रत व दर सहा महिन्यांनी होणाऱ्या सर्वेक्षणाची प्रत उपलब्ध करण्यात येऊ शकते.

६) **श्री संजय घोरपडे, राहणार-कामेरी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-साताराः-** यांनी असे मत मांडले की सदरहू प्रकल्पास परिसरातील सह्याद्री साखर कारखान्याने आक्षेप हे त्यांच्या म्हणजे सह्याद्री साखर कारखान्याच्या फायद्यासाठी घेतलेले आहेत. सदरहू सह्याद्री कारखाना शेतक§यांची पिळवणूक करते असाच स्थानिकांचा आरोप आहे. तरी परिसरातील सामाजिक आर्थिक प्रगती होण्यासाठी सदरहू प्रकल्पाची गरज असून प्रकल्प प्रवर्तकांनी सामाजिक भान लक्षात ठेऊन प्रकल्प कार्यान्वित करावा. येथील स्थानिक शेतकरी बैठकीत उपस्थित असल्याची माहिती देऊन त्यांनी प्रकल्पास शुभेच्छा दिल्या.

७) **श्री विलास पवार, पिंपरी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-साताराः-**श्री पवार यांनी सदरहू प्रकल्पातून किती सांडपाणी प्रकल्पाबाहेर पडेल व त्यामुळे भूजल खराब होईल काय व सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे बॉयलरला लागणाऱ्या पाण्यामुळे परिसरात पाण्याची टंचाई भासेल अशी भिती व्यक्त केली.

➢ प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी पूर्णपणे प्रकिया करुन परत उत्पादन प्रक्रियेत व प्रकल्पातील हरितपट्टा विकसित करण्यासाठी वापर करणार असल्याबाबतची संपूर्ण तांत्रिक माहिती सविस्तर सांगितली व सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजे शून्य द्रव निःसारण प्रकल्प आहे याची ग्वाही दिली.

८) **श्री धनाजी आमले, राहणारमु.पोस्ट औंध, तालुकाखटाव, जिल्हा-साताराः** त्यांनी आक्षेप नोंदविला की सदरहू प्रकल्पामुळे परिसरात सांडपाण्याचे प्रदूषण होईल. परिसरातील विहिरी व भूगर्भाचे पाणी प्रदूषित होईल. त्याचप्रमाणे उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणाऱ्या बगॅसमुळे परिसरातील शेतातील पीकांवर परिणाम होईल. प्रकल्पात मळीवर आधारित आसवणी प्रकल्प असल्यामुळे परिसरात मळीच्या वासाने नागरिकांना त्रास होईल.

➢ प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले निर्देश पाळणे बंधनकारक असून सदरहू प्रकल्पातून सांडपाण्याचा एकही थेंब बाहेर पडणार नाही. प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरींग सयंत्रणा कार्यान्वित करणे बंधनकारक असून हवा प्रदूषणाच्या विविध घटकांची पातळी पाळण्यात येईल. प्रकल्पातील बॉयलरला इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर कार्यान्वित करण्यात येणार आहे व साखर उत्पादन करताना, उत्पन्न होणारा बगॅस हा बंद कन्व्हेअर बेल्टने इंधनासाठी सहविद्युत प्रकल्पात पाठविण्यात येईल. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की प्रकल्पात आपत्कालिन व्यवस्थापन योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे.

कारखाना हवा व जल प्रदूषण नियंत्रणासाठी योग्य ती खबरदारी घेणार असल्याने स्थानिकांना सदरहू प्रकल्पाबाबतचे गैरसमज टाळावेत.

- येथे प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की उपस्थित करण्यात आलेले अनुभव हे पूर्वीचे अस्तित्वात असलेल्या जुन्या कारखानाबाबतचे आहेत. आपल्या प्रकल्पात अत्यंत आधुनिक उत्पादन सयंत्रणा व अत्यंत आधूनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. मळी ही आसवणी प्रकल्पात उत्पादनाचा कच्चा माल म्हणून वापरण्यात येईल. सदरहू प्रकल्पामुळे परिसरात प्रदूषण होणार नाही.

९) **<u>श्री हेमंत माने, राहणार-रहिमतपूर, तालुका-कोरेगाव, सातारा</u>** - श्री माने यांनी आक्षेप नोंदविला की उत्पादनासाठी पाणी लागेल. त्यासाठी पाणी उचलण्यात येईल. दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची उपलब्धता कमी असताना प्रकल्पासाठी पाणी उचल्याने स्थानिकांना पिण्यासाठी पाणी मिळणार नाही. त्यांनी पुढे असाही आक्षेप नोंदविला की आसवणी प्रकल्प हा ३१० दिवस चालवता येत नाही. बऱ्याच स्थानिकांच्या जमिनी ह्या प्रकल्पांसाठी गेल्या. दुष्काळामुळे पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे स्थानिकांच्या अडचणी वाढू नयेत. तरी याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी लेखी हमी द्यावी.

- प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी उत्तर दिले की, प्रकल्पासाठी लागणारे पाणी अंदाजाप्रमाणे (वॉटर बजेटींगप्रमाणे) शासनाच्या पाटबंधारे विभागाबरोबर केलेल्या कराराप्रमाणे कृष्णानदीतून घेण्यात येईल. त्याचप्रमाणे उत्पादनप्रक्रियेतील सांडपाण्याचा प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे स्थानिकांना प्रकल्पामुळे पाण्याची टंचाई भासणार नाही.
- याठिकाणी प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की, उत्पादनप्रक्रियेत आधुनिक सयंत्रणा व प्रणाली कार्यान्वित करण्यात येईल. सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. ऊसामध्ये ६५-६८% पाणी असते. तर गाळप झालेल्या ऊसापासून २८% बगॅस निघतो. उत्पादनातील सांडपाणी प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनप्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल.,उत्पादनात आर. ओ.(रिव्हर्स ऑस्मोसिस) प्रणाली अंगिकारण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तकांना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांनी पारित केलेले निर्देश हे पाळावेच लागतात. सदरहू प्रकल्पामुळे परिसराच्या विकासाला हातभार लागणार आहे.

१०) **<u>श्री विलास पवार, राहणार-पिंपरी, तालुका- कोरेगाव, जिल्हा-सातारा</u>**- श्री पवार यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की सादरीकरणात कामगारांच्या निवासी भागातून उत्पन्न होणाऱ्या घरगुती सांडपाण्याबाबतचा काहीही उल्लेख नाही.

सांडपाण्यामुळे कामगाराच्या आरोग्यावर धोका पोहचेल. त्यावर उपाययोजना करावी.

- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की संपूर्ण प्रकल्प व कामगार निवासी विभाग मिळून सुमारे ४५.० घनमीटर घरगुती सांडपाणी उत्पन्न होईल. त्यावर प्रक्रियेसाठी घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. प्रक्रियेनंतर घरगुती सांडपाणी हे प्रकल्पातील व कामगार निवासी भागात हरित पट्टा विकसित करण्यासाठी वापरण्यात येईल.
- पर्यावरणविषयक विषयक जाहिर लोकसुनावणी समिती सदस्य, समन्वयक श्री बाबासाहेब कुकडे यांनी सादरीकरणात प्रकल्पातील घरगुती सांडपाणी सयंत्रणा योजनेबाबत संपूर्ण माहिती दिली नसल्याचे निदर्शनास आणले. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी ती देण्याचे आश्वासन दिले.

११) **श्री हिंदुराव तातोबा देसाई, राहणार-३८५/४, शनिवार पेठ,कराड, जिल्हा-सातारा:-** श्री देसाई यांनी पुन्हा आक्षेप नोंदविला की पूर्वीच्या प्रकल्प प्रवर्तक (जिजामाता शुगर एण्ड पॉवर इंडस्ट्रीज लिमिटेड) यांची पाच वर्षांपेक्षा जास्त साखरेचे व्यापारी उत्पादन न केल्याने आय.ई.एम. वैधता नसताना, सदरहू प्रकल्प कार्यान्वित नसताना व प्रकल्प स्थानावर उत्पादन सयंत्रणा कार्यान्वित नसताना व प्रकल्प कार्यान्वित नसताना विस्तारिकरण कसे होऊ शकते? प्रकल्प प्रवर्तक यांनी उपस्थितांना आवाहन केले की त्यांनी फक्त सदरहू प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक काही टीका टिप्पणी, सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्यात याव्यात.

१२) **श्री अप्पा पवार, राहणा-पिंपरी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा:**-यांनी स्थानिक जनतेस प्रकल्प हवा असल्याचे मत मांडले. प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधी मिळेल.

पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती अध्यक्ष यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना वा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे पुन्हा एकदा आवाहन केले. उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद नसल्याचे निर्दशनास आल्यावर सदस्य,समन्वयक यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद नसल्याने, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यांनी बैठकीत सांगितले की सह्याद्री साखर कारखाना, यशवंतनगर, तालुका-कराड, जिल्हा-सातारा यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली आहे. सदरहू बैठकीचे इतिवृत

तयार करण्यात येईल व ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व प्राप्त झालेले लेखी आक्षेप भारत सरकारच्या पर्यावरण,वने, हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. संबंधित तज्ज्ञ समिती सर्व बाबींचा विचार करुन योग्य निर्णय घेईल.

मे. जिजमाता शुगर अँड पॉवर इंडस्ट्रीज लिमिटेड या कारखान्यास सन २००२-२००३ साली साखरेचे गाळप करण्यासाठी मंजुरी दिली आहे. पण २००३-२००४ सालापासून साखर कारखान्याने गाळप बंद केलेले आहे.

दरम्यान मे. जिजामाता शुगर अँड पॉवर इंडस्ट्रीज लिमिटेड हा कारखाना मे. शिवनेरी शुगर्स लिमिटेड यांचेकडे हस्तांतरीत झालेला आहे. जर मे. जिजामाता शुगर अँड पॉवर इंडस्ट्रीज लिमिटेड हा कारखाना २००३-०४ सालापासून कार्यरत नाही तर प्रथम मेसर्स. शिवनेरी शुगर्स लिमिटेड यांनी ८०० टीसीडी ऊस गाळप सुरु करणेकरीता अर्ज करणे आवश्यक होते. परंतु मे. शिवनेरी शुगर्स लिमिटेड यांचेकडून १०००० टीसीडी ऊस गाळप क्षमतेच्या विस्तारासाठी अर्ज करण्यात आला आहे. वस्तुस्थिती पाहता, अध्यक्षांच्या मते सदरील पर्यावरण विषयक जन सुनावणी वैध नाही. तसेच सुनावणीच्या वेळी इतर कारखान्यांसह शेतकरी यांनी देखील मोठया प्रमाणात आक्षेप घेतलेला आहे.

मा.अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिक जनता, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानून पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहिर केले.

सदरहू पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बैठकीस स्थानिक उपस्थित होते.

**(श्री सुनील थोरवे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा- सातारा

**( बाबासाहेब कुकडे)**
सदस्य, समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,सातारा